# शोध संपला; मानखुर्दमध्ये उभारणार नवीन कारागृह

## ११ एकर शासकीय जमीन केली अतिक्रमणमुक्त

### मुंबई मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे जागा सुपूर्द



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यात विद्यमान कारागृहांवरील वाढता ताण लक्षात घेऊन नवीन कारागृह उभारण्यासाठी जागेचा अनेक वर्षे शोध सुरू होता. घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडलगत असलेल्या सुमारे ११ एकर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटवण्यात आले असून या ठिकाणी नवीन कारागृह उभारण्यात येणार आहे. अतिक्रमणमुक्त झालेली ही जमीन आता मुंबई मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते मानखुर्द येथील या जमिनीचा ताबा अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांना देण्यात आला.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडलगतच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली होती. ८ एप्रिल रोजी एका दिवसात १२०० पेक्षा अधिक झोपड्या हटवून सुमारे ११ एकर शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात प्रशासनाला यश आले.

### महत्त्वाची शासकीय जमीन ताब्यात

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, मानखुर्द येथील ही ११ एकर शासकीय जमीन नवीन कारागृह उभारणीसाठी उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले होते.
- त्यानुसार अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) गृह विभाग तसेच अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी सदर जमिनीची मागणी केली होती.
- प्रशासनाच्या समन्वयातून आणि महसूल विभागाच्या प्रभावी कारवाईमुळे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटवून ही महत्त्वाची शासकीय जमीन ताब्यात घेण्यात यश आले आहे. राज्यातील वाढती कैद्यांची संख्या आणि कारागृहांवरील ताण कमी करण्यासाठी नवीन कारागृह उभारणीचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.


डॉ. श्रीकांत शिंदेंच्या पुढाकाराचे फलित : 'एक्स'वरील पोस्टमध्ये मंत्री उदय सामंतांनी मानले आभार

# गुंतवणुकीला १.१४ लाख कोटींचे बूस्टर!

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबई महानगर क्षेत्रात ५०० एमडब्ल्यू क्षमतेचा 'ग्रीन एआय कॉम्प्युट हब' आणि डेटा सेंटर पार्क निर्मितीसाठी एएम इंटेलिजन्स लॅब्ससोबत झालेला १.१४ लाख कोटींचा करार हा शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याचे यश आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. 'एक्स'वरील पोस्टमध्ये मंत्री सामंत यांनी खासदार डॉ. शिंदे यांचे आभार मानले.

उद्योग क्षेत्रात तंत्रज्ञानाचा आणि 'इंटेलिजन्स'चा प्रभावी वापर करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही एमएमआर क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यासाठी प्रयत्न केले. खासदार डॉ. शिंदे यांच्या विशेष निमंत्रणावरून एएम इंटेलिजन्स लॅब्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसोबत महाराष्ट्र शासनाने १.१४ लाख कोटींचा (१२ अब्ज डॉलर्स) सामंजस्य करार केला. खासदार डॉ. शिंदे यांनी मुंबई आणि नवी दिल्लीत घेतलेल्या सातत्यपूर्ण बैठका व पाठपुराव्याचे हे यश आहे, असे मंत्री सामंत यांनी म्हटले आहे.

### डिजिटल आणि एआय राजधानीच्या दिशेने पाऊल



- या गुंतवणूक करारामुळे मुंबई महानगर क्षेत्रात ५०० एमडब्ल्यू क्षमतेचा 'ग्रीन एआय कॉम्प्युट हब' आणि डेटा सेंटर पार्क उभारले जाणार आहे.
- यामुळे येथे २,००० ते ३,००० पेक्षा जास्त उच्च-तंत्रज्ञान रोजगारांची निर्मिती होईल.
- २४ तास नवीकरणीय ऊर्जेवर चालणारा हा देशातील अग्रगण्य प्रकल्प ठरेल, असा विश्वास मंत्री सामंत यांनी यावेळी व्यक्त केला.
- महाराष्ट्राला देशाची 'डिजिटल आणि एआय राजधानी' बनवण्याच्या दिशेने उचललेले हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे, असे ते म्हणाले.

## दानपेटीतील पैसे चोरणाऱ्याला अटक

**डोंबिवली, (वा.)** एमआयडीसी निवासी विभागात असलेल्या सिद्धिविनायक मंदिरात शुक्रवारी एका चोरट्याने दर्शन घ्यायच्या बहाण्याने दान पेटीतील पैसे हे बारीक काठीला गम लावून काढत असल्याचे सीसी कॅमेऱ्यात दिसून आले. त्याला शिताफीने पकडून मानपाडा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

## कामा रुग्णालयाचे अधीक्षक सायकलवर

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भविष्यात इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत कामा अँड ऑलब्लेस रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांनी दैनंदिन कामकाजासाठी सायकलचा वापर सुरू केला आहे.



यावेळी डॉ. पालवे यांनी सायकल चालवण्याचे आरोग्यदायी फायदेही उपस्थितांना समजावून सांगितले. नियमित सायकल चालवल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते, शारीरिक तंदुरुस्ती वाढते, वजन नियंत्रणात राहते तसेच मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

# ड्रग्जमाफियांवर धडक कारवाई; ५२ गुन्हे दाखल

**वसई (वा.)** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत वाढत्या अमली पदार्थांच्या विळख्याला रोखण्यासाठी पोलिसांनी व्यापक कारवाई मोहीम राबवत अवघ्या २४ दिवसांत ड्रग्ज तस्कर आणि सेवन करणाऱ्यांवर मोठी कारवाई केली आहे. या विशेष मोहिमेदरम्यान विविध पोलिस ठाणे, गुन्हे शाखा आणि अमली पदार्थ विरोधी पथकाने संयुक्त कारवाई करत तब्बल १ कोटी ९० लाख २ हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त केले असून ५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत ५१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरात मेफेड्रोन, गांजा, हेरॉईन, कोकेन आणि ब्राऊन शुगर यांसारख्या अमली पदार्थांची तस्करी वाढत असल्याचे दिसत आहे. विशेषतः तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते.



अनधिकृत • फौजदारी गुन्हे दाखल करा; अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश

# थेट जलवाहिनीला मोटार लावणारे रडारवर




**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयातील पाणीसाठा घटल्याने शुक्रवारपासून संपूर्ण महानगरात १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. या काळात नागरिकांना समान पाणी मिळावे यासाठी थेट जलवाहिन्यांवर किंवा नळजोडणीवर अनधिकृतपणे विद्युत मोटार (पंप) लावून पाणी उपसा करणाऱ्यांविरुद्ध कठोर दंडात्मक कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे कडक निर्देश अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

पाणीकपातीच्या पार्श्वभूमीवर पालिका मुख्यालयात जल अभियंता विभागातील अभियंत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी बांगर यांनी स्पष्ट केले की, काही नागरिक स्वार्थासाठी विद्युत मोटारींचा वापर करून जादा पाणी खेचतात, ज्यामुळे इतर भागांतील नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळते. अशा तक्रारींची गंभीर दखल घेत, अनधिकृत मोटार आढळल्यास ती त्वरित जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. वारंवार नियम मोडणाऱ्यांची नळजोडणीही खंडित केली जाणार आहे.

### अभियंत्यांसाठी 'ॲक्शन प्लॅन' आणि सूचना

जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठा पावसाळ्यापर्यंत पुरवण्यासाठी महापालिकेने हे पाऊल उचलले आहे. नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, अनधिकृत पंपांचा वापर थांबवावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.पाणीकपातीमुळे विशेषतः उंचावरील आणि दूरच्या अंतरावरील भागात पाणीपुरवठ्याची समस्या उद्भवू शकते. यासाठी प्रत्येक विभागाचा स्वतंत्र 'ॲक्शन प्लॅन' तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पाणीपुरवठ्याच्या निर्धारित वेळेत सहायक आणि दुय्यम अभियंत्यांनी स्वतः 'ऑन फील्ड' उपस्थित राहून दाबाची तपासणी करावी.



स्थानिक रहिवासी आणि लोकप्रतिनिधींना पाणीपुरवठ्यातील तांत्रिक अडचणींची माहिती देऊन त्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करावे. तक्रारी सोडवण्यास विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली जाईल.

## ठाण्यात सराफाला १४ लाखांचा गंडा

**ठाणे, वा.** १०० ग्रॅम सोन्याचा बार स्वस्त दरात विकण्याचे आमिष दाखवून एका सराफ व्यावसायिकाला तब्बल १४ लाख रुपयांना लुटल्याची धक्कादायक घटना ठाण्यात उघडकीस आली आहे. धनेश नाडार (३१) असे फसवणूक झालेल्या सराफाचे नाव असून, याप्रकरणी ठाण्यातील चितळसर पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुंबईतील गोरेगाव येथे राहणारे धनेश नाडार यांचे स्वतःचे ज्वेलर्सचे दुकान आहे. नाडार यांचा मित्र अथर्व गायधनी याने त्यांची ओळख जय तांडेल नावाच्या व्यक्तीशी करून दिली होती. जयकडे १०० ग्रॅम सोन्याचा बार असून तो तो स्वस्त दरात विकण्यास तयार असल्याचे सांगण्यात आले. दोन्ही बाजूंनी बोलणी झाल्यानंतर हा व्यवहार १४ लाख रुपयांमध्ये निश्चित झाला.

**Short News**

## शॉक लागून २१ वर्षीय कामगाराचा मृत्यू

**नालासोपारा:** नालासोपाऱ्यातील पेल्हार परिसरात एका कंपनीत काम करत असताना विजेचा धक्का लागून २१ वर्षीय तरुण कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्घटनेमुळे औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पेल्हार परिसरातील नमन इंडस्ट्रीज या कंपनीत गुरुवारी रात्री आठच्या सुमारास ही दुर्घटना घडली. देवकुमार गौतम असे मृत कामगाराचे नाव असून तो अवघ्या तीन महिन्यांपूर्वीच कंपनीत कामाला लागला होता. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तो मेहनत करत असताना काळाने त्याच्यावर घाला घातला. देवकुमार हा रात्रीच्या शिफ्टमध्ये लेझर मशीनवर काम करत होता.

# बोगस दंतवैद्यांना बसणार लगाम

### क्यूआर कोडवर मिळणार दंतचिकित्सकांची माहिती; पारदर्शकता वाढणार



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यातील बेकायदेशीर आणि विनानोंदणी दंतप्रॅक्टिसला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेकडून 'नो युअर डेंटल प्रॅक्टिशनर (केवायडी) हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना दंतचिकित्सकाची अधिकृत नोंदणी, वैधता आणि स्पेशालिटीची माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून त्वरित पडताळता येणार आहे. त्यामुळे बोगस दंतवैद्य शोधणे सोपे होणार असून, दंतसेवांमधील पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, परिषदेमार्फत प्रत्येक नोंदणीकृत दंतचिकित्सकाला अधिकृत केवायडी शीट देण्यात येत असून, ती दवाखान्याच्या प्रवेशद्वारावर किंवा प्रतीक्षागृहात ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परिषदेकडून १ मे २०२६ पासून इंग्रजीसोबत मराठी भाषेतही नोंदणी प्रमाणपत्रे जारी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> 'हा उपक्रम सार्वजनिक हितसुरक्षा, दंतव्यवसायातील शुचित्व आणि व्यावसायिक विश्वासार्हता टिकवण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल. रुग्णांना योग्य आणि नोंदणीकृत दंतचिकित्सकाची माहिती सहज उपलब्ध होईल.'
> **–डॉ. नरेंद्र काळे, अध्यक्ष,** महाराष्ट्र राज्य दंत परिषद.

### पुस्तिकेचे झाले प्रकाशन

राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते नव्या नोंदणी प्रमाणपत्राचे तसेच 'हँडबुक ऑफ प्रॅक्टिशनर गाईडलाईन्स' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तिकेत दंतवैद्यकीय व्यवसायाशी संबंधित कायदे, नैतिक आचारसंहिता, क्लिनिकसाठी आवश्यक परवानग्या आणि रुग्ण व्यवस्थापनासंदर्भातील महत्त्वाची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे.

## ६९ वर्षीय वृद्धाला २४ लाखांचा गंडा

**ठाणे, (वा.)** ठाणे शहरात सायबर गुन्हेगारी आणि चोऱ्यांचे सत्र सुरूच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली ढोकाळी येथील एका सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची तब्बल २४ लाख ६५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तर दुसऱ्या एका घटनेत, वागळे इस्टेट परिसरातून चोरी झालेली रिक्षा अवघ्या पाच दिवसांत शोधून काढण्यात श्रीनगर पोलीसांना यश आले असून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून फसवणुकीचे जाळे विणणाऱ्या सायबर भामट्यांनी आता ठाण्यातील एका ज्येष्ठ नागरिकाला आपले सावज बनवले आहे.

# ॲनेक्स मॉलमध्ये एसी स्फोटामुळे आग



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबईतील बोरिवली परिसरात ॲनेक्स मॉलमध्ये अचानक भीषण आग लागल्याने घबराट पसरली. प्राथमिक अहवालानुसार, एसी सिस्टीममध्ये झालेल्या स्फोटानंतर आग वेगाने पसरली आणि पहिल्या मजल्यावर पसरली. सुदैवाने सर्वांना वेळेवर सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. यामुळे एक मोठी दुर्घटना टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला किरकोळ असलेली ही आग वेगाने पसरली आणि संपूर्ण पहिल्या मजल्यावर पसरली. आग इतकी भीषण होती की, आजूबाजूच्या लोकांमध्ये घबराट पसरली. मॉलमधून निघणाऱ्या उंच ज्वाला आणि दाट काळा धूर दूरवरून दिसत होता. आत असलेले लोक घाबरून बाहेर पळाले, तर जवळचे लोक घटनास्थळी जमा झाले. परिस्थिती अधिकच बिघडत असल्याचे पाहून अग्निशमन दलाला तात्काळ पाचारण करण्यात आले.

### प्रशासनाने तत्काळ इमारत केली रिकामी

सुरक्षेच्या कारणास्तव, प्रशासनाने तात्काळ संपूर्ण मॉलची इमारत रिकामी केली. कोणताही संभाव्य धोका टाळण्यासाठी लोकांना वेळेवर बाहेर काढण्यात आले. आगीत तळमजल्यावरील अनेक दुकाने आणि मालाचे मोठे नुकसान झाले असून, त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या संपूर्ण घटनेतील सर्वात दिलासादायक बाब म्हणजे कोणीही जखमी किंवा बाधित झाले नाही. सर्वांना वेळेवर सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. ज्यामुळे एक मोठी दुर्घटना टळली.

माहिती मिळताच अग्निशमन दलाची अनेक वाहने घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी त्वरित काम सुरू केले आणि संपूर्ण परिसर सील केला. आग विझवण्याचे कार्य युद्धपातळीवर सुरू असून, आग पसरू नये यासाठी पथके सतत कार्यरत आहेत.

# संशयातून मित्राची हत्या; आरोपीस ३ तासांत अटक

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** गोरेगाव येथील आरे कॉलनी परिसरात पत्नीच्या कथित अनैतिक संबंधांच्या संशयातून एका व्यक्तीने तिच्या मित्राची चाकूने गळा चिरून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात आरे पोलिसांनी आरोपीला अवघ्या तीन तासांत अटक केली.

भीमराज ओमप्रकाश शर्मा (वय ४८) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून मृत व्यक्तीचे नाव विकास भुसारे असे आहे. आरोपीला पत्नी आणि विकास यांच्यात कथित संबंध असल्याचा संशय होता. या कारणावरून दोन्ही कुटुंबांमध्ये यापूर्वीही अनेकदा वाद झाले होते.घटनेच्या रात्री आरोपीने विकासला घरी बोलावले होते. त्यावेळी आरोपी, त्याची पत्नी आणि विकास हे तिघेही एकत्र बसून मद्यपान करत होते. दरम्यान, जुन्या वादावरून त्यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला. रागाच्या भरात आरोपी घरात गेला आणि धारदार चाकू घेऊन परत आला. त्यानंतर त्याने विकासच्या गळ्यावर वार केले.

### गुन्ह्याची दिली कबुली

घटनेनंतर आरोपी आरे कॉलनी परिसरातील जंगल भागात पळून गेला, मात्र घटनेची माहिती मिळताच आरे पोलिसांनी तातडीने पथके तयार करून शोधमोहीम सुरू केली. परिसराची नाकेबंदी करत पोलिसांनी आरोपीला अवघ्या तीन तासांत ताब्यात घेतले. पोलिस चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. या प्रकरणी आरे पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अभिलेख आता 'एआय वॉल्ट'मध्ये

### कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने नागरी दस्तऐवजांचे होणार डिजिटल जतन

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.**मुंबई महापालिकेच्या ई-वॉर्डातील जन्म-मृत्यू नोंदी, विवाह नोंदी यांसारखे जुने नागरी अभिलेख आता अत्याधुनिक 'व्हिजन एआय वॉल्ट' प्रणाली अंतर्गत डिजिटल स्वरूपात जतन करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांना आवश्यक कागदपत्रे अवघ्या काही सेकंदांत उपलब्ध होणार असून, पूर्वी आठवडे किंवा काही प्रकरणांत वर्षभर लागणारी प्रक्रिया आता वेगवान होणार आहे.

महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त महापालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्या पुढाकारातून हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जुन्या हस्तलिखित दस्तऐवजांचे स्कॅनिंग, वर्गीकरण आणि डिजिटल संग्रहण केले जाणार आहे.



डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले की, अनेक दशकांपासून जतन केलेले दस्तऐवज दमट हवामान, पावसाळा आणि काळाच्या ओघात खराब होत आहेत. अनेक नोंदींवरील शाई फिकी पडली असून, पाने ठिसूळ झाली आहेत.

### सेवागतीत होणार वाढ

- त्यामुळे या ऐतिहासिक अभिलेखांचे संवर्धन करणे आवश्यक होते. या एआय प्रणालीद्वारे इंग्रजी, मराठी आणि हिंदी हस्तलिखित मजकूर अचूकपणे वाचता येणार आहे.
- पुसट झालेली अक्षरे स्पष्ट करणे, जीर्ण पानांचे पुनरुज्जीवन करणे आणि तत्काळ डिजिटल प्रमाणपत्र तयार करणे शक्य होणार आहे. नागरिकाने केवळ नाव टाइप केल्यानंतर संबंधित नोंद काही क्षणांत उपलब्ध होणार असल्याने पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सेवागतीत मोठी वाढ होणार आहे.

तक्रार प्राप्त | महाराष्ट्र सायबरचे गुगल प्ले स्टोअरला आदेश; बजावली नोटीस

# बेकायदा बाइक-टॅक्सी ॲप्स हटवावेत!




**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राज्यातील सायबर गुन्ह्यांसाठी नोडल कार्यालय असलेल्या महाराष्ट्र सायबरच्या अतिरिक्त पोलिस महासंचालक कार्यालयाने ओला, उबर व रॅपिडो या बाइक टॅक्सी सेवा देणाऱ्या ॲप्सना प्लॅटफॉर्मवरून हटवण्याचे आदेश दिले आहेत. याबाबतची नोटीस सायबर पोलिसांनी गुगल प्ले स्टोअरला दिली असून, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ७९(३)(ब) अंतर्गत ही नोटीस बजावण्यात आली आहे.

गृह विभागाच्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र सायबरला कलम ७९(३)(ब) अंतर्गत नोटीस देण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६८ नुसार गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध करण्याचे अधिकार या कार्यालयाला आहेत. या संदर्भात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कार्यालयाकडून बाइक टॅक्सी ॲप्सच्या अनधिकृत कामकाजाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. परिवहन मंत्र्यांनी स्वतः या प्रकरणाची दखल घेत अशा ॲप्सद्वारे बाइक टॅक्सी सेवा चालवणे बेकायदेशीर व कायद्याचे उल्लंघन असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर आता सायबर पोलिसांनी गुगलला नोटीस पाठवली आहे.

### अनधिकृत सेवांमुळे प्रवासी सुरक्षेला गंभीर धोका

- काही ॲप-आधारित प्लॅटफॉर्म वैध परवानगी, सरकारी मान्यता किंवा परिवहन विभागाचे नियम व मोटार वाहन कायद्याचे पालन न करता मोठ्या प्रमाणावर बाइक टॅक्सी सेवा चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. या अनधिकृत सेवांमुळे प्रवासी सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.
- चालक पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षा उपाययोजना व आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचे समोर आले आहे. बेदरकार व निष्काळजी वाहनचालनामुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका वाढला असल्याचे सायबर पोलिसांनी नोटीसमध्ये म्हटले आहे.

### व्यवसाय भारतात असल्याने भारतीय कायदे लागू




सार्वजनिक सुरक्षा व कायद्याचे पालन करण्यासाठी ओला, उबर व रॅपिडो ॲप्स हटवून त्यांचा वापर बंद करण्याचे निर्देश गुगल प्ले स्टोअरला देण्यात आले आहेत. तुमच्या संस्थेचा भारतात व्यवसाय असल्याने भारतीय कायदे लागू होतात. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या निर्देशांचे पालन न केल्यास गंभीर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असा इशाराही सायबर पोलिसांनी नोटीसच्या माध्यमातून दिला आहे.माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ७९(३)(ब) व माहिती तंत्रज्ञान मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे २०११ नुसार कारवाई न केल्यास कलम ८५(२) किंवा इतर संबंधित कायद्यांतर्गत जबाबदार धरले जाईल. लवकरात लवकर सकारात्मक उत्तर अपेक्षित असल्याचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांनी नोटीसमध्ये म्हटले आहे.

# अपहरणप्रकरणी आरोपी गजाआड

### आरे पोलिसांची कारवाई; बिहारच्या समस्तीपूरमधून अल्पवयीन मुलीची सुटका

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** मुंबईतील आरे पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या अपहरणाच्या प्रकरणात, पोलिसांनी जलद कारवाई करत एका अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका केली असून आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार संगीता सत्यप्रकाश सुमन (वय ४०) यांनी तक्रार केली की, २० मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास, त्यांची अल्पवयीन मुलगी मुंबईतील अंधेरी पूर्व, सारिपूतनगर, जेव्हीएलआर रोड, प्रजापूर पाडा येथील घरातून वेरावली बीएमसी शाळेत पुस्तके जमा करायला जात असल्याचे सांगून बाहेर पडली, परंतु रात्री उशिरापर्यंत घरी परतली नाही. शोध घेऊनही तिचा ठावठिकाणा लागला नाही. तक्रारदारांना संशय होता की, अज्ञात व्यक्तीने तिला आमिष दाखवून तिचे अपहरण केले आहे.



गुन्हा दाखल होताच, गुन्हे अन्वेषण पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान मुलीचा मोबाईल फोन घरातच असल्याचे आढळून आले. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने, पोलिसांनी कॉल डिटेल रेकॉर्ड मिळवला, ज्यात एक संशयास्पद मोबाईल नंबर आढळला. लोकेशन ट्रॅक केल्यावर तो नंबर दिल्लीत सक्रिय असल्याचे समजले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने, आरे पोलिस पथक तात्काळ दिल्लीसाठी रवाना झाले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने, संशयास्पद मोबाईल नंबरधारकाला एका किराणा दुकानातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान, त्याने सांगितले की, तो मोबाईल फोन त्याचा भाऊ, अंशुकुमार राजकुमार पासवान याचा होता आणि तो एका मुलीला सोबत घेऊन बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यातील त्याच्या आजीच्या घरी गेला होता.

### आरोपीला ४ दिवसांची पोलिस कोठडी; तपास सुरू

या माहितीच्या आधारे, पोलिस पथक थेट दिल्लीहून बिहारमधील समस्तीपूर येथे गेले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने, भाटगामा भागातील दयाल चौकात असलेल्या आरोपीच्या आजीच्या घरावर छापा टाकण्यात आला आणि आरोपी व अल्पवयीन मुलीला ताब्यात घेण्यात आले. समस्तीपूर येथील विशेष पॉक्सो न्यायालयाकडून आरोपीला ट्रान्झिट रिमांडवर मुंबईला आणण्यात आले. नंतर त्याला बोरिवली येथील ६८ व्या न्यायालयात हजर करण्यात आले. जिथे न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, मुलीला तिच्या कुटुंबीयांच्या सुखरूप ताब्यात देण्यात आले आहे.

CMYK